| MHLA120018212023 | **निशाणी क्रमांक १० वरील आदेश** |
|---|---|

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे उपअधिक्षक भुमिअभिलेख, निलंगा यांची कोर्ट कमीशनर म्हणून नेमणुक करणे करीता दाखल केलेला आहे.

०२. वादी पुढे असे कथन करतात की, त्यांनी प्रतिवादीविरुध्द विवाद जमिनीच्या हद्दीखुणा कायम करुन व कायमचा मनाईहुकूम मिळणेकरिता दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी दाव्यात हजर होवुन वादीचा दावा मिळकतीवरील कब्जा नाकारलेला आहे व ते वादीला दावा मिळकतीचा कब्जा देण्यास तयार नाहीत. त्यामुळे वादीची मौजे नणंद, ता.निलंगा येथील जमीन गट नं.४६६ मधील एकुण क्षेत्र ०४ हेक्टर, ६३ आर, आकार १८ रुपये ६६ पैसे या मिळकतीची व प्रतिवादीच्या जमिनीची मोजणी करुन तसा अहवाल न्यायालयात उपअधिक्षक भूमी अभिलेख, निलंगा यांनी दाखल करण्याचा आदेश त्यांना देण्यात यावे अशी विनंती वादी करतात.

०३. प्रतिवादी यांनी सदरच्या अर्जावर म्हणणे दाखल केले नसल्यामुळे त्यांच्या म्हणण्या व्यतिरीक्त अर्ज पुढे चालू ठेवण्यात आलेला आहे.

०४. वादीतर्फे विधीज्ञ श्री.एम.यु.तळीखेडकर यांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अर्ज, म्हणणे व अभिलेख पाहिला. प्रस्तुतचा दावा वादीने हद्दीखुणा कायम करुन व कायमचा मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. वादीने त्याच्या अर्जाच्या पृष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र नि.क्र.११ कडे दाखल केलेले आहे. प्रतिवादी वादीच्या जमिनीच्या उत्तरेकडील बाजुच्या हद्दीखुणा नष्ट करण्याच्या प्रयत्नात आहेत व वादीच्या विवाद मिळकतीवरील शांततामय कब्जास अडथळा व हस्तक्षेप करत आहेत.

दावा मिळकती ही निर्विवादपणे स्थावर मालमत्ता असल्यामुळे त्याच्या सर्व नोंदी भुमिअभिलेख यांच्याकडे असतात. दाव्याचे स्वरुप व वादीने केलेली मागणी पाहता दावा मिळकतीची मोजणी मा. तालुका निरीक्षक भुमि अभिलेख कार्यालय, निलंगा यांना कोर्ट कमिशनर यांच्यामार्फत होणे हे अंतिम न्यायनिर्णयाकरीता आवश्यक आहे असे दिसुन येते. सबब, अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे, असे मत नोंदवून मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| २. | उप अधिक्षक, भूमी अभिलेख, निलंगा यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणुक करण्यात येते. त्यांनी प्रत्यक्ष वादी यांच्या मौजे नणंद, ता.निलंगा येथील जमीन गट नं.४६६ मधील क्षेत्र ०४ हेक्टर, ६६ आर या मिळकतीची मोजणी करुन, जागेची परिस्थिती पाहून, हद्दी खुणा कायम करुन तसा अहवाल नकाशासह सदर कोर्टात सादर करणेचा आहे. |
| ३. | उपअधिक्षक भूमी अभिलेख यांना निर्देशित करण्यात येते की त्यांनी मोजणीच्या पुर्वी दोन्ही पक्षकारांना माहिती देणेची आहे. |
| ४. | वादीनी सदर मोजणीकरीता लागणारी फी व कागदपत्रे देण्याची आहेत. |
| ५. | रिट कमिशन पाठविण्यात यावे. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2025.12.09 11:00:10 +0530

निलंगा
दि. ०८/१२/२०२५

( श्रीमती. के. पी. गाडे )
२ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर
निलंगा, जि.लातूर.